लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य
ला. प्र. वि.

दिनांक ०७/१०/२०२३.

प्रेस नोट

| | | |
|---|---|---|
| १ | ला.प्र.वि.कार्यालय | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, मुंबई. |
| २ | गु.र.क्र | ३३/२०२३ |
| ३ | कलम | कलम ७ भ.प्र.अधि. १९८८ |
| ४ | आरोपीचे नांव कार्यालयाचा पत्ता | श्री. राजन गोपीनाथ म्हात्रे, हिं.५४ वर्षे, धंदा - नोकरी ( अनुज्ञापन निरीक्षक) जाहिरात विभाग, नेमणूक आर नॉर्थ वॉर्ड, दहिसर, बृहन्मुंबई महानगर पालिका, मुंबई रा.ठि. बाभई महंत निवास, लक्ष्मी छाया निवास बिल्डिंगसमोर, बाभई रोड नं.२, लोकमान्य टिळक रोड, बोरीवली (पश्चिम), मुंबई |
| ५ | मागणी केलेली लाचेची रक्कम | रु. २०,०००/- तडजोडीअंती रु. १०,०००/- |
| ६ | स्विकारलेली लाचेची रक्कम | रू १०,०००/- |
| ७ | हस्तगत लाचेची रक्कम | रू १०,०००/- |
| ८ | थोडक्यात हकीगत | फिर्यादी यांचे बोरीवली (प), मुंबई याठिकाणी सलोन आहे.फिर्यादी यांच्या सलोनच्या विनापरवाना डिस्ले बोर्डसाठी बी.एम.सी च्या आर नॉर्थ वॉर्ड, दहिसर येथील जाहिरात विभागाचे अनुज्ञापन निरीक्षक श्री.राजन म्हात्रे यांनी नोटिस दिली होती.त्यानंतर प्रत्यक्ष भेटीदरम्यान सदरचा दंड रु.४०,०००/- इतका असल्याचे सांगितले व दंड भरावयाचा नसल्यास रु.२०,०००/- द्यावे लागतील असे आलोसे यांनी सांगितले.फिर्यादी यांनी केलेल्या विनंतीनंतर तडजोडीअंती श्री. म्हात्रे यांनी रु.१०,०००/- स्विकारण्याचे कबूल केले. फिर्यादी यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक २५/०९/२०२३ रोजी या कार्यालयात प्रत्यक्ष येवून लेखी तक्रार दिली.<br><br>लोकसेवक यांनी फिर्यादीकडे लाचेची मागणी केलेबाबत प्राप्त तक्रारीनुसार दिनांक ०५/१०/२०२३ रोजी केलेल्या पडताळणीमध्ये आलोसेने फिर्यादीकडे रु.२०,०००/- लाचेची मागणी केल्याचे व तडजोडीअंती रु.१०,०००/- स्विकारण्याचे कबूल केल्याचे निष्पन्न झाले.<br><br>दिनांक ०६/१०/२०२३ रोजी लोकसेवक यांनी फिर्यादी यांचे सलोनमध्ये जावून लाचेची रक्कम रू.१०,०००/-स्विकारली असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले.म्हणून लोकसेवक यांचेविरोधात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क** : लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.
टोल फ्री क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२,
फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८,
वेबसाईट: acbmaharashtra.gov.in.
ई मेल :acbwebmail@mahapolice.gov.in.
ई मेल :addlcpacbmumbai@mahapolice.gov.in.
फेसबुक :www.facebook.com - Maharashtra ACB.
मोबाईल ॲप :www.acbmaharashtra.net.

( नितिन दळवी )
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई